Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | शेतकरी आत्महत्या : एक चिंतन<br>**प्रा. डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत** | ५१-५३ |
| १४ | गडचिरोली जिल्ह्यातील माडीया गोंड, स्वशासन आणि समस्या<br>**सुधीर पां. ठाकरे** | ५४-५८ |
| १५ | जाती आरक्षण कि वोट बँक राजकारण : एक चिंतन<br>**डॉ. कमलकिशोर बा. इंगोले** | ५९-६२ |
| १६ | खाजगीकरणात जनतेच्या विकासामध्ये बँकींग व वित्तीय संस्थेचे स्थान<br>**प्रा. डॉ. मधुकर नक्षीणे** | ६३-६७ |
| १७ | अमरावती जिल्ह्यातील साक्षरता वाढीचा तुलनात्मक अभ्यास (२००१ व २०११)<br>**डॉ. मनीषा अमित गावंडे** | ६८-७२ |
| १८ | स्त्री सबलीकरणाच्या संदर्भात स्त्रीमुक्ती चळवळची भूमिका<br>**डॉ. ज्योती सुभाष सेलुकर** | ७३-७७ |
| १९ | पर्यावरण प्रदूषण<br>**ज्योती व्हि. कवठे (रणदिवे)** | ७८-८३ |
| २० | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे महिला विकाससंबंधी विचार<br>**डॉ . दीपाली प्र. गावंडे** | ८४-८८ |
| २१ | बाळासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व आणि कार्य<br>**डॉ. डोंगरे एल. बी.** | ८९-९१ |
| २२ | चंद्रपूर जिल्ह्यातील भूमिउपयोजन परिवर्तनाचा कृषीवरील प्रभाव<br>**डॉ. प्रमोद मोहनराव वसाके** | ९२-९७ |
| २३ | भारतीय सांविधानिक तरतुदी आणि आरक्षणाचे स्वरुप<br>**प्रा. विजय एस. कांडलकर** | ९८-१०१ |
| २४ | भारता समोरील आव्हाने : शेतकरी आव्हाने शेतकरी आत्महत्या : कारणमिमांसा<br>**प्रा. सौ. वैशाली एस. पाटील** | १०२-१०४ |
| २५ | खाजगीकरण<br>**डॉ. केंद्रे तातेराव एकनाथ** | १०५-१०७ |



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १३. शेतकरी आत्महत्या : एक चिंतन

प्रा. डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत
सहाय्यक प्राध्यापक, जवाहर महाविद्यालय, अणदूर.

**प्रस्तावना**

शेतक-यांची आत्महत्या हा एक ज्वलंत प्रश्न आहे. पूर्वीच्या काळी आत्महत्या ही संकल्पना परकी नव्हती. आत्महत्या होत होत्या. त्या आत्महत्या ज्या कारणांनी होत होत्या त्यामध्ये आर्थिक कारणांशिवाय इतर सामाजिक, मानसिक कारणे कारणीभूत होती. परंतू 1990 च्या दशकापासून ' आत्महत्या ' या राक्षसरूपी शब्दाने संपूर्ण व्यवस्था डगमगून टाकल्याचे दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य साधारण महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रातील तर बहुतांश लोकांना आपल्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून राहावे लागते. ग्रामीण जनतेच्या दृष्टीने हेच उपजीविकेचे साधन आहे. सुरूवातीपासून महाराष्ट्रातील शेतीमध्ये अनेक समस्या पहावयास मिळतात. दारिद्र्य, विषमता, नैसर्गिक आपत्ती इ. समस्यांना तोंड द्यावे लागते. पण अलीकडच्या काळात महाराष्ट्रातील शेतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शेतक-यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. त्यातून शेतकरी कंटाळून आत्महत्येचा मार्ग स्वीकारू लागला आहे.

देशात होणा-या शेतकरी आत्महत्या लक्षात घेता शासकीय पातळीवर विविध पॅकेजच्या माध्यमातून तरतूदी करण्यात आल्या आहेत. तरी देखील शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबायला तयार नाही. म्हणून समाजातील सर्व घटकांना हेलावून सोडणारा हा प्रश्न सर्वच स्तरावर कळीचा ठरत आहे. ही परिस्थिती का आली आणि यातून बाहेर पडण्याचा शाश्वत मार्ग काढणे क्रमप्राप्त झाले आहे.

**भारतातील शेतक-यांच्या आत्महत्या**

भारतातील शेतक-यांची दयनीय अवस्था फार पूर्वीपासून आहे.महात्मा फुले यांच्या 'शेतक-यांचा आसूड ' आणि ' इशारा ' ( 1883 ) या ग्रंथामध्ये पहावयास मिळते. या ग्रंथामध्ये महात्मा फुले यांनी शेतक-यांच्या दु:ख भावनांचे विश्लेषण केले आहे.

भारतात शेतक-यांच्या आत्महत्या या इ.स.1990 पासून सुरू झाल्या . भारतातील महाराष्ट्र, आंध्रपदेश , पंजाब केरळ, कर्नाटक, तामिळनाडू इ. राज्यात शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या व होत आहेत. यामध्ये कर्जबाजारी पण, आरोग्य, दुष्काळ, मुलांच्या शिक्षणावरील खर्च इ. कारणे आत्महत्येस कारणीभूत आहेत.

Principal.
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्येबद्दल टोकाच्या भूमिका घेतलेल्या दिसतात. एकीकडे असं म्हटलं जात की, केवळ मिडियाने निर्माण केलेली एक सनसनाटी समस्या आहे. आणि दुसरीकडे शेतक-यांच्या म्हणावल्या जाणा-या आत्महत्या या आत्महत्या नाहीतच. तसेच सरकारकडून भरपाई मिळवण्यासाठी नैसर्गिक मृत्यूसद्धा आत्महत्या आहेत असे भासवले गेले आहे. पण वास्तवात विभाग निहाय विचार करता विदर्भातील शेतकरी मोठया प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत असे आढळून आले आहे. विदर्भाप्रमाणेच शेतकरी आत्महत्यांचे लोण हे मराठवाडा, खान्देश , कोकण व पश्चिम महाराष्ट्रात ही पसरलेले आहे.

**आत्महत्येचा जीवघेणा प्रश्न थांबवण्यासाठी उपाययोजना**

शेतक-यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी कोणत्याही एका दिशेने केलेला विचार अथवा त्यामार्गातून सुचणारा तोडगा हा रामबाण उपाय असणार नाहीत. त्यावर विविध उपाययोजना करणे आवश्यक आहे.

1) शेती मालावरील आधारीत उद्योगधंद्याची उभारणी ग्रामीण भागात होणे आवश्यक आहे.
2) अनुदानाऐवजी गुंवतणूकीवर जास्त भर देण्याची आवश्यकता आहे.
3) शेतीसाठी मुबलक प्रमाणात जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
4) शेतक-यांना मोठया बाजारपेठेत कोणत्याही अडथळयांशिवाय प्रवेश देण्यात यावा.
5) शेतक-यांना कमी व्याजदराने सहकारी संस्था आणि इतर संस्थानातून त्वरीत कर्ज उपलब्ध करून द्यावे.
6) जलसिंचन क्षेत्रात वाढ करावी.
7) पीक विम्याची व्यापकता वाढवून त्याचा सर्वत्र अंमल करावा.
8) शेतमाल ठेवण्यासाठी चांगल्या प्रकारच्या गोदामाची व्यवस्था करण्यात यावी.
9) विना परवानाधारक सावकारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करून सरकारने सावकारी पध्दतीवर बंदी आणावी.
10) शेतक-यांच्या मुलांना आर्थिक निकषांच्या आधारावर शिक्षणात व नोकरीमध्ये आरक्षण ठेवून त्याचा भार सरकारने उचलावा.
11) आत्महत्येतून कुटुंब , समाज आणि पर्यायाने राष्ट्राचे नुकसान होते. तेंव्हा समाज व सरकार यांनी एकत्र येऊन सामुहीक प्रयत्न केले पाहिजेत.

**निष्कर्ष**

1. शेतक-यांच्या आत्महत्या ही भारतातील गंभीर समस्या आहे.
2. भारतातील शेतक-यांच्या आत्महत्येसाठी कुठलेही एकच कारण पूर्णतः जबाबदार नाही तर कर्जबाजारीपणा, सिंचन सुविधांचा अभाव, विद्युत समस्या, सरकारचे दुटप्पी धोरण, कृषीपूरक योजनांचा अभाव, धर्मरूढी, परंपरा व सामाजिक घटक यासारखे अनेक घटक जबाबदार आहेत.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

3. सरकारने शेतक-यांच्या मदतीसाठी पॅकेज किंवा कर्जमाफी जाहीर करणे हा कायमस्वरूपी उपाय नाही तर ही एक तात्पुरती उपाययोजना आहे. त्यामुळेच पॅकेज व कर्जमाफी करूनही आजदेखील शेतक-यांच्या आत्महत्या सुरूच आहेत.

4. जागतिक पातळीवर भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे.

समारोप

आज ही शेतकरी अनेक समस्यांनी ग्रासलेला दिसून येतो. वाढते कुटुंब, आरोग्य , अन्नधान्याची कमतरता, शिक्षणाचा अभाव इ.कारणांमुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत जीवन जगताना दिसत आहे. बहुतांश कुटुंबे शेतीवर अवलंबून आहेत. जागतिक बाजारपेठा, अनेक संस्था व वाढत्या -खाजगीकरणामुळे शेतक-यांच्या जगण्याचा वाटा बंद केल्या आहेत. म्हणून शेतक-यांमध्ये त्याला आत्महत्येशिवाय पर्यात उरलेला नाही. म्हणून शेतक-यांमध्ये जागृती होणे आवश्यक आहे. यासाठी त्यांच्या मालास योग्य भाव निर्माण करून देणे गरजेचे आहे व त्यांच्या खर्चापेक्षा उत्पन्न कसे जास्त करता येईल यासाठी सतत प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

संदर्भ

1. डॉ.भालचंद्र मुणगेकर, आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा, प्रकाशक प्रकाश विश्वासराव, लोकवाड्.मय गृह भुपेरा गुप्ता भवन
2. स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्थाः भोसले के.एम.,काटे के.बी.,9 वी आवृत्ती
3. डॉ.भोरे दि.बा., सिंचन साधना, महाराष्ट्र सिंचन सहयोग, औरंगाबाद 2010, पृ.354
4. भास्कर लक्ष्मण भोळे, किशोर बेडकिहाळ, बदलता महाराष्ट्र .
5. के.नागराज- भारतातील शेतक-यांच्या आत्महत्या परिणाम , प्रवाह, विशेष प्रकार अहवाल, चेन्नई 2008
6. अर्थसंवाद अंक

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.